रू. ५०,००,०००/–	(अक्षरी रूपये पन्नास लक्ष फक्त) हि रक्कम लिहून घेणार/खरेदीदार यांनी लिहून देणार/विक्रेता यांना एचडीएफसी बॅंक या बॅंकेवरील धनादेश क्र. ००४०४९ दिनांक २०–०२–२०१९ अन्वये दिले, त्याची पोच या विक्रीपत्राद्वारे लिहून देणार/विक्रेता देत आहे.
रू. ५,०५,५०,०००/–	**(एकूण किंमत अक्षरी पाच करोड पाच लक्ष पंन्नास हजार फक्त)**

लिहून देणार/विक्रेता मान्य व कबुल करतात की उपरोक्त सौदयाचा विक्री भरणा हा त्यांच्यामध्ये झालेल्या कौटुंबीक आपसी समझौत्यानुसार घेण्याचे ठरले असल्याने त्यांनी निर्देशीत केल्याप्रमाणे उपरोक्त तपशिलानुसार मोबदल्याचा भरणा लिहून घेणार/खरेदीदार यांनी केलेला/करीत असुन भविष्यात याबाबत उपरोक्त लिहून देणार/विक्रेता तसेच त्यांचे वालीवारसांन कोणत्याही प्रकारचा उजर/दावा/वाद करणार नाही याची हमी या लेखाद्वारे देत असुन त्याची तोषीस लिहून घेणार/खरेदीदार यांना लागु देणार नाही.

(३) अशा प्रकारे या विक्रीपत्राचा लेख लिहून व सही करून देतेवेळी, लिहून देणार/विक्रेता असे जाहीर व कबुल करतात की, परिशिष्टातील शेतीच्या जमिनीच्या विक्रीची पूर्ण किंमतीपैकी रू. १,४६,५०,०००/– त्यांना लिहून घेणार/खरेदीदार यांचेकडुन मिळाली असून आता लिहून देणार/विक्रेता यांना लिहून घेणार/खरेदीदार यांचे कडुन उर्वरीत विक्रीच्या रकमेपोटी दिलेले पुढील तारखेचे धनादेश कोणत्याही कारणास्तव अनादरीत झाल्यास लिहून देणार/विक्रेता यांना होणाऱ्या नुकसानाची व खर्चाची भरपाईस लिहून घेणार/खरेदीदार हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

(४) लिहून देणार/विक्रेता याव्दारे घोषीत करतात की ते विकत असलेली उपरोक्त दोन्ही स्थावर मालमत्ता/शेतजमीनी हया त्यांच्या स्वतंत्र मिळकती असुन त्यावर त्यांचे व्यतीरीक्त इतर कोणालाही कसल्याही प्रकारचा हक्क तथा अधिकार प्राप्त झालेला नसुन त्या त्यांना विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे त्यामुळे त्यांचे व्यतीरीक्त इतर कुणालाही या विक्रीपत्रान्वये विकलेल्या दोन्ही स्थावर मालाचे मालकी हक्क प्राप्त झालेले नाहीत.

(५) सदर दोन्ही स्थावर मालमत्ता विकणे माझ्या म्हणजे लिहून देणार/विक्रेता यांचे दृष्ट्रिने सोयीस्कर व हितकारक आहे. सबब विक्रीचा हा व्यवहार माझ्या कुटुंबीयांचे देखिल हिताचाच आहे.

(६) लिहून देणार/विक्रेता घोषीत करतात की हया दोन्ही शेतजमिनी त्यांना कोणासही कोणत्याही तऱ्हेने हस्तांतरीत करण्याचा हक्क होता व त्यांनी त्या शेतजमिनी अथवा त्यांचा कोणताही भाग कोणासही कोणत्याही प्रकारे कधीही, विक्री, बक्षीस, गहाण, भाडेपट्टा, कुळ, बोझा, पोटगी, अन्नवस्त्र किंवा इतर अन्य कुठल्याही तऱ्हेने हस्तांतरीत केलेल्या नाही अथवा तसा तोंडी व लेखी करारही इतर कोणासही केलेला नाही किंवा सदरहु दोन्ही

पुढील पानांवर .....

हगन
२१६८ / २०१९
९ / ३२

Scanned with CamScanner

शेतजमिनीसंबंधी वाद निर्माण होईल अशी कुठलीही गोष्ट, कृती, हरकत केलेली नाही व अशी निर्वेध सिमांकीत केलेल्या दोन्ही शेतजमिनी या विक्रीपत्राद्वारे लिहून देणार/विक्रेता ने लिहून घेणार/खरेदीदार ला विकलेल्या आहे, असे आश्वासन लिहून देणार/विक्रेता हे लिहून घेणार/खरेदीदार ला देत आहे व ती माहीती चुकीची अथवा खोटी निघाल्यास व पुढे त्यामुळे लिहून घेणार/खरेदीदार चे मालकी वा ताब्यातून त्या मिळकती व त्यांचा कोणताही भाग गेल्यास, त्याचे संपूर्ण निवारण व भरपाई करण्याची सर्व प्रकारचे खर्चाची व नुकसानीची जबाबदारी पूर्णपणे लिहून देणार/विक्रेता ची राहील. तसेच लिहून देणार/विक्रेता असे आश्वासन देतात की, सदरहु दोन्ही विकलेल्या शेतजमिनी हया तुकडे प्रतिबंधक व एकीकरण कायद्यानुसार तुकडा होत नाही व महाराष्ट्र ॲग्रीकल्चरल लँडस (सिलींग ऑन होल्डींग) ॲक्ट प्रमाणे, अतिरिक्त जमिन नाही. तसे आढळल्यास त्याची पुर्णजबाबदारी, खर्चासह लिहून देणार/विक्रेता ची राहील.

(७) सदर स्थावर दोन्ही मालमत्ता मी तुम्हास बिनबोझ्याने विकत दिलेली आहे. त्यासंबंधी मला असलेले सर्व प्रकारचे मालकी ताब्यासंबंधीचे सर्व हक्क तथा अधिकार आता पूर्णपणे नष्ट झाले असून सदर दोन्ही स्थावर मालमत्तेचे तुम्ही म्हणजेच लिहुन घेणार/खरेदीदार आता संपूर्ण मालक झालेले आहात.

(८) शासनाने महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश २०१६ (सन २०१७ चा महा.३) चे कलम ३ चे उपकलम (१) नुसार महानगर प्रदेश क्षेत्रासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थापन करण्याची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक ४ मार्च २०१७ रोजी प्रसिध्द केली असुन महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस–२४१६/प्र.क्र. १२२(अ)/२०१६/नवि–९ दिनांक ५/१/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे नागपूर महानगर क्षेत्राची विकास योजना मंजुर केली आहे. सदरची जमीन ज्याचा भुमापन/खसरा क्र. १५३/१ ही मंजुर विकास योजनेनुसार साउथ ए सेक्टर मध्ये असून "निवासी (R-3) & निवासी (R-4)" तसेच भुमापन/खसरा क्र. १६१/१ ही मंजुर विकास योजनेनुसार "निवासी (R-3) & निवासी (R-4)" या उपयोगाकरीता/विभागात समाविष्ट/दर्शविली असून ती अथवा तिचा भाग रिक्वीझीशन, ॲक्वीझीशन अथवा रिझर्वेशन, कोतवाल डुंग, बुडीतक्षेत्र, अथवा कोणत्याही सरकारी योजने अंतर्गत समाविष्ट नाही. तसेच सदर जमीन अथवा तिचा भाग हा कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नव्हता व नाही.

(९) सदरील दोन्ही मिळकतीचे वर्णनामध्ये भविष्यात काही चूक झालेली आहे अथवा कायदेशीर त्रूटी आहे, असे निदर्शनास आल्यास, उभयतांनी तसा दुरूस्ती व पूरक दस्त करावयाचा आहे व तसे कायदेशीर बंधन उभयतांवर राहील. चुकीचे वर्णनामुळे, कायदेशीर त्रूटीमुळे सदरील दस्त वा सदरील व्यवहार बेकायदेशीर होणार नाही, हे उभयंतास मान्य व कबूल आहे.

(१०) या दोन्ही शेतजमिनीचे सर्व प्रकारचे सरकारी/निमसरकारी देणे, टॅक्सेस, चार्जेस, सेसेस, असेसमेंट आदी, जे विक्रीपत्राचे तारखेपावतो आकारले आहेत. त्याचा भरणा लिहून देणार/विक्रेता यानी केलेला आहे व पुढे त्याच काळाकरीता आकारले/मागीतले गेल्यास ते

पुढील पानांवर .....

हगन
9961 | २०१९
90 | 32

JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NAGPUR

Scanned with CamScanner